
Special Issue Vol-01, Jan. to March 2021

Vidyawarta®

Peer Reviewed International Refereed Research Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# New Agriculture Acts 2020 : Problems and Prospects



**Chief Editor**
Dr.Bapug Gholap
**Editor**
Dr. Omprakash Kshirsagar
**Co-Editor**
Dr. Madan Shelke

DR. M. K. UMATHE COLLEGE ★ NAGPUR

42] नवीन कृषी कायदा २०२०चे फायदे व तोटे
डी. ई. खोजे, प्रा. डॉ. आर. बी. सांगुळे ||179

43] नविन कृषी कायदे२०२०– समीक्षात्मक आढावा
डॉ. पंकज तायडे--पिंजर, जि अकोला ||182

44] नवीन कृषी कायदा २०२०– फायदे व तोटे
प्रा. डॉ. विजय के. बनसोड . नागपूर ||187

45] नवीन कृषि कायद्याचे फायदे आणि तोटे
प्रा.गजानन आनंता देवकर, उमरी जि नांदेड ||191

46] नवीन कृषी कायदे आणि किमान आधारभूत किंमतीचे धोरण
प्रा. डॉ. गंगाधर रामराव भुक्तर, शिराळा, जि. सांगली ||193

47] कृषी बाजार आणि नविन कृषी कायदे
डॉ. किशोर वि. साबळे, अमरावती ||198

48] नवीन कृषी कायदे व ग्रामीण विपणन
प्रा. के. एस चव्हाण, जि-- नाशिक ||200

49] Sustainable Development Goals: The 2030 Agenda for Sustainable ...
Dr.Yogesh Ankushrao Borade ||203

50] Organic Farming policies in India : An Overview.
Prabhugouda.K. & Dr.T.Gurubasappa.R, Kalaburagi ||206

51] नवीन कृषी कायदे आणि शेतक--यांचे सक्षमीकरण
sandhya sonkamble ||212

52] नवीन कृषी कायदा २०२०: फायदे आणि तोटे
डॉ. दशरथ काळे, विश्वनाथ पांडुरंग हिस्सल ||216



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

44

# नवीन कृषी कायदा २०२०— फायदे व तोटे

प्रा. डॉ. विजय के. बनसोड
सहयोगी प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग
डॉ. एम.के. उमाठे कॉलेज,नागपूर २२

**********

प्रास्ताविक :

भारतातील अर्थव्यवस्थेत शेती हा महत्त्वपूर्ण घटक असून यास भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा समजला जातो. १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणानंतरही शेती क्षेत्राचे भारतीय अर्थव्यवस्थेत गौरवपूर्ण स्थान कायम राहिले आहे. आजच्या घडीला देशातील जवळपास ७० टक्के लोक शेती व शेतीसंबंधीत व्यवसायावरच निर्भर आहेत. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा हिस्सा कमी होत चालला असला तरी देशात कृषीचे महत्त्व सदोदीत वाढतच आहे. याचे कारण खायला अन्न व हाताला रोजगार देण्याचे प्रचंड सामर्थ्य याच क्षेत्रात आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

१. शेतकऱ्यांच्या आर्थिक दुर्बलतेच्या कारणांचा शोध घेणे.
२. नवीन कृषी कायदा २०२०व कृषी व्यवस्थेतील दोष अभ्यासणे.
३. शेतकऱ्यांची गरीबी व कर्जबाजारीपणाला कायमचा ब्रेक लागावा यासाठी शासन, शेतकरी व शेती संबंधीतांसाठी उपाययोजना सुचविणे.
४. भारतीय शेती क्षेत्राची पार्श्वभूमी :

देशातील सकल घरेलु उत्पादनात (ळकच) शेती क्षेत्राचा वाटा खालील प्रमाणे आहे.

| वर्ष | १९५०-५१ | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-२००१ | २०१०-२०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ५८.८% | ५२.५% | ४४.५% | ३८.१% | ३०.९% | २५.८% | १७.१९% |
| वर्ष | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० |
| | १६.८५% | १८.२०% | १७.७% | १७.९% | १७.२% | १६.१% | १७.७६% |

वरिल तक्त्यावरून स्पष्ट होत आहे की, देशाच्या सकल घरेलु उत्पादनात शेती क्षेत्राचा हिस्सा कमी होत असून उद्योग व सेवा क्षेत्राचा हिस्सा वाढत आहे. मात्र याचा अर्थ असा होत नाही की, शेती क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व कमी होत आहे. कारण उद्योग व सेवा क्षेत्राचा विकास हा शेती क्षेत्रावर अवलंबून असून सर्वाधीक रोजगार देणारे क्षेत्र म्हणून शेती क्षेत्राचा पहिला मान कायम आहे. असे असले तरी भारतातील शेती जरी श्रीमंत क्षेत्र असले तरी या क्षेत्राचा मालक अजुनही गरीब आहे. याच शेतकऱ्यांचे सर्वागीण हीत साधण्यासाठी वर्तमान भारताय जनता पक्षाच्या सरकारने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात दुप्पट वाढ करण्याहेतु अनेक सहाय्य योजना, पीक वीमा, जल संरक्षण, कापणी व्यवस्थापन योजने पासून तर कृषी विपणन सुधार अशा अनेक उपाययोजना केल्या आहेत.

यापुढे जाऊन सरकारने कृषी उत्पादन व्यापार आणि वाणिज्य विधेयक २०२० या अंतर्गत—

१) शेतकरी (अधिकार व संरक्षण) करार, किंमत हमी व शेती सेवा कायदा २०२०.

२) शेतकरी शेतमाल व्यापार व विक्री (उत्तेजन व सुविधा) कायदा २०२०.

३) अत्यावश्यक वस्तु (दुरूस्ती) कायदा २०२०

ह्या कायद्यांचा वटहुकूम ५ जून, २०२० रोजी काढला. तसेच हा कायदा लोकसभेत १७ सप्टेंबर, २०२० ला व राज्यसभेत २० सप्टेंबर, २०२० ला पारीत करून २८ सप्टेंबर, २०२० ला राष्ट्रपतीच्या सह्या होऊन हा कायदा अस्तित्वात आणला गेला. म्हणजेच हा कायदा ५ जून, २०२० पासून लागू झाला आहे.

**कायदे करण्यामागची भूमिका :**

हा नवीन कायदा आणण्यासाठी सरकारची भूमिका खालीलप्रमाणे आहे—

१) देशातील शेती क्षेत्राचे विभाजन मोठ्या प्रमाणात झाले असून शेती करण्यात देशातील शेतकऱ्यांना अनेक अडचणी येत आहेत.

२) शेती क्षेत्राचे निसर्गावरील अवलंबित्व कमी करून हवामानचे धोके कमी करणे



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

३) शेतीत पेरलेले किती उगवेल व उगविल्यानंतर ते किती येईल व कोणत्या भावाने खपेल याची शाश्वती देणे.

४) शेती क्षेत्रात खाजगी भांडवलदार व विदेशी कंपन्यांनी गुंतवणूक करावी.

५) शेतीत दर्जेदार पीक तयार करून त्याची विदेशात निर्यात व्हावी.

६) शेतीत कमीत–कमी खर्चात जास्तीत–जास्त उत्पन्न मिळावे.

७) कृषी उत्पन्न समिती व (राज्यसरकार) च्या जाचक अटीतुन शेतकऱ्यांची मुक्तता व्हावी.

८) शेतमाल विक्रीतील अडते, दलाल, मापकरी यांच्या जाचातुन मुक्तता व्हावी.

९) शेतमालाचर स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विक्री करता यावी.

१०)शेतकऱ्यांच्या उत्पन्नात दुप्पट वाढ व्हावी.

११)शेतमाल साठवीणे, शेतमालाचे परिवहन समस्या, विपणन समस्या त्यातुन शेतकऱ्यांची मुक्तता व्हावी.

१२)गोदामे, शीतगृहे, प्रक्रिया उद्योग, मालाची विदेशात विक्री यासाठी खाजगी गुंतवणूकदारांना या क्षेत्राकडे आकर्षित करणे.

**नवीन कायदे व त्यांचा प्रमुख हेतू :**

वरील प्रमाणे नवीन कृषी कायदे करण्यासाठी सरकारची भूमिका पाहिल्यावर नविन कायदे करण्यासाठी या कायदा मागचा प्रमुख हेतू काय आहे हे बघणे महत्त्वाचे ठरते. ते खालील प्रमाणे आहेत.–

१) शेतकरी (अधिकार व संरक्षण) करार, किंमत हमी व शेती सेवा कायदा– २०२० या कायद्याचा मुख्य हेतू हा शेतकऱ्यांनी व्यापारी, कंपनी बरोबर करार करता यावा तसेच येणाऱ्या पीकाची किंमत हंगामा आधीच ठरविण्याचा व पीक आधीच विकता यावे. शेतकरी व व्यापारी यांना थेट व्यापाराची मुभा ही कमीत–कमी एक हंगाम व जास्तीत–जास्त पाच वर्षाचा राहील. शेतमाल उत्पादनाचे मूल्य, निश्चिती व करारातील वादाची सोडवणूक व आव्हान याची तरतूद या कायद्यात केलेली आहे.

२) शेतकरी शेतमाल व्यापार व विक्री (उत्तेजन व सुविधा) कायदा २०२० या कायद्याचा मुख्य हेतू हा आहे की, शेतकऱ्यांना आपल्या मालाची विक्री कोणत्याही मध्यस्थाशिवाय थेट व्यापाऱ्यांना करता येणार असून ही विक्री स्थानिक, राज्यात, देशात, परदेशात कुठेही थेटपणे करता येईल. या विधेयकामुळे शेतमालाला कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाहेर जिल्हा, राज्य व देशात कुठेही विकण्याची मुभा ही शेतकऱ्यांना मिळाली असून इलेक्ट्रॉनिक व्यापाराचीही तरतूद या विधेयकात असल्यामुळे राज्य सरकारकडुन लावले जाणारे बाजार शुल्क, सेस, कर इत्यादी शेतकऱ्यांना भरावा लागणार नाही.

३) आवश्यक वस्तु (दुरूस्ती) कायदा २०२०. या कायद्याचा मुख्य हेतु हा आहे की, प्रत्येक व्यापाऱ्याला किमान व कमाल माल खरेदी करण्याची सीमा होती. ही सीमा एकाधिकार निर्माण होऊ नये यासाठील लादली गेली होती. आता मात्र या कायद्यानुसार व्यापाऱ्यांना शेतमाल कितीही प्रमाणात खरेदी करणे, त्याची साठवणूक करणे व वाढीव किंमतीत त्याची विक्री करणे यासाठी व्यापाऱ्यांवर, कंपनीवर कोणतेही निर्बंध नसेल. या कायद्यानुसार आता तृणधान्ये, डाळी, तेलबिया, कांदे, बटाटे या शेतमालास जीवनावश्यक वस्तुंच्या यादीमधुन वगळले आहे. नैसर्गिक आपत्ती किंवा युद्धजन्य परिस्थितीचा अपवाद वगळता सरकार या व्यापाऱ्यांच्या साठवणुकीवर बंदी आणु शकणार नाही.

**नवीन कृषी कायद्याचे फायदे :**

१) कृषी उत्पन्न बाजार समितीतील होणारी शेतकऱ्यांची अडवणूक व लुट संपुष्टात येईल.

२) शेतकऱ्यांच्या शेतीमालाला मोठी बाजारपेठ उपलब्ध होईल.

३) शेतकऱ्यांना माल विक्रीप्रकरणी कोणतेही कर, शुल्क, सेस भरावा लागणार नाही.



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

४) देशातील कृषी क्षेत्रात थेट परकीय गुंतवणूक येण्यास मदत होईल.

५) शेतकऱ्यांना आपला शेतमाल विकण्यासाठी बाजारापर्यंत आणण्याचा खर्च वाचेल.

६) काय पीकवावे, किती पिकेल व पिकलेले काय भावाने खपेल या चिंतेतुन शेतकऱ्यांची मुक्तता होईल.

७) शेतकऱ्यांना त्यांच्या पीकाची योग्य किंमत स्पर्धेमुळे प्राप्त होईल.

८) जास्त किंमत मिळविण्यासाठी दर्जेदार पीक तयार करण्यास शेतकऱ्यास उत्तेजन मिळेल.

९) पीक विक्रीचे व्यवहार उघड व पारदर्शी होतील.

१०)संगणकाद्वारे मालाची थेट विक्री करता येणे शक्य होईल.

११) शेतमाल, शेतकरी, व्यापारी अशी नवीन साखळी निर्माण होईल.

१२)शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल.

१३)शेती क्षेत्रात नवीन रोजगार निर्माण होतील.

१४)शेतमाल परदेशात विकल्यामुळे सरकारला विदेशी चलन प्राप्त होईल.

१५)जास्तीचे पीक शेतमाल साठवणुकीसाठी गोदामे, शितगृहे तयार होतील.

१६)शेतमालाची नासाळी संपुष्टात येईल.

१७)शेतमालावर प्रक्रिया करून ते टीकविणे व विदेशात विक्री करणे शक्य होईल.

१८)शेतमाल साठविणे, त्याचा परिवहण व्यय व किंमती यावरील जाचक बंधने संपुष्टात येऊन शेतमालांची किंमत संपूर्ण देशात समान होण्याची प्रवृत्ती निर्माण होईल.

**नवीन कृषी कायदा २०२० चे तोटे :**

नवीन कृषी कायद्याच्या अंमलबजावणीमुळे खालील प्रकारचे तोटे संभवतात—

१) 'शेतीकरार पद्धती' याचा अनेक राज्यात प्रयोग केल्या गेला. मात्र याचे वाईट परिणामच शेतकऱ्यांना भोगावे लागले हे एक कटू सत्य आहे.

२) करार करतांना अशिक्षीत, गरीब, रूढीप्रिय शेतकरी व व्यापारी किंवा कंपनी यात करार कोणाच्या बाजुने झुकेल हे सांगण्याची गरज नाही. म्हणजे शेतकरी परत संकटात ढकलला जाईल.

३) शेती व उद्योग यात प्रचंड फरक असून शेती ही निसर्गाच्या लहरीमानावर अवलंबून असुन या क्षेत्रातील शेतमाल कराराद्वारे विक्री ही कल्पनाच मनोरंजक वाटते.

४) शेतकरी व व्यापारी किंवा कंपनी यात करार भंग झाल्यास शेतकऱ्यांना कोर्टात न जाता जिल्हाधिकारी यांना न्याय मागावा लागेल. शेतकरी व जिल्हाधिकारी यांच्यातील अंतर हे जमीन व आकाशा एवढे असल्याने शेतकऱ्यास न्याय मिळणे अशक्य होईल.

५) गरीब शेतकरी व श्रीमंत व्यापारी किंवा कंपनी या दोघात होणारा करार हा पारदर्शी, उघड व निष्पक्ष होऊ शकतो ही बाबच मुळी स्वप्नरंजक वाटते.

६) या कायद्यांमुळे कृषी उत्पन्न बाजार समितीतील शेतकऱ्यांना विपणनात येणाऱ्या अडचणी कायद्याद्वारे व सरकारी इच्छाशक्तीद्वारे संपुष्टात आणने शक्य आहे. एवढ्यासाठी नवीन कयद्याची गरज नाही.

७) या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे शेतकऱ्यांना हक्काची बाजारपेठ कृषी उत्पन्न बाजार समिती हळुहळु कमकुवत होऊन बंद होण्याची भिती राहील.

८) शेतमालास मिळणारा हमीभाव सुरवातीस खाजगी व्यापारी देतीलही मात्र कृषी उत्पन्न बाजार समित्या संपुष्टात आल्यावर शेतमाल हमीभावचे काय होईल हे सांगता येत नाही.

९) कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ऐवजी खाजगी बाजार समिती असल्यास बाजार समितीचे सर्वच दोष दूर होतील हे विश्वासपूर्वक सांगता येत नाही.

१०)या कायद्यामुळे शेतकऱ्यास आपला माल कुठेही विकता येणे शक्य असले तरी सद्या स्थिती पाहता तो आपला माल स्थानिक बाजाराशिवाय विकणे त्याला शक्य होणार नाही.



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

११)सरकार—शेतकरी—ग्राहक ही अन्न साखळी संपुष्टात येऊन खाजगी व्यापारी—शेतकरी—ग्राहक ही नवीन साखळी निर्माण झाल्यामुळे शेतकरी, ग्राहक व गरीब वर्गाचे अतोनात हाल संभवतात.

१२)सरकारने व्यापाऱ्यांना शेतमाल खरेदीची व साठवणूकीच्या मर्यादितुन मुक्तता केल्यामुळे व्यापारी शेतमाल स्वस्तात खरेदी करतील व ग्राहकांना महागात विकतील. यामुळे शेतकरी व ग्राहक दोघांचेही प्रचंड आर्थिक नुकसान होईल.

१३)व्यापारी व कंपन्यांना शेतमाल खरेदीचे सर्व अधिकार दिल्यामुळे सरकारी खरेदी संपुष्टात येईल.

१४)सरकारी शेतमाल खरेदी संपुष्टात आल्यास काहीच वर्षात शेतकरी हा व्यापारी व कंपन्याच्या खरेदी विक्री धोरणावर निर्भर राहील.

१५)सरकारी शेतमाल खरेदी संपुष्टात आल्यास सार्वजनिक वितरण प्रणाली आपोआप संपुष्टात येऊन अन्न सुरक्षा कायदाही संपुष्टात येईल.

१६)सरकारी शेतमाल खरेदी संपुष्टात आल्यास देशातील सर्व स्वस्त धाण्याच्या दुकानांना आपोआप टाळे लागेल.

१७)खाजगी व्यापारी व कंपनी यांना साठवणुकीची परवानगी दिल्यास सरकारच्या गोदामाची अवलंबत्व कमी होऊन हळु—हळु ही व्यवस्था खाजगी क्षेत्राकडे जाईल.

**समारोप:**

नवीन कृषी कायदा २०२० या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे होणारे फायदे व तोटे यांचा विचार करता हा प्रश्न निर्माण होतो की, असे कायदे करण्यासाठी कुठेही शेतकरी आंदोलन झाले नाही. तसेच कायदा तयार करतांना देशातील नागरिकांचे मत सरकारने मागविलेच नाही. याशिवाय हे कायदे लागु करण्यासाठी सरकारणे दाखविलेली कोरोना काळातील घाई या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सरकारची प्रबळ इच्छाशक्ती, खाजगी कंपन्यांनी कायदा येण्याआधिच कृषी क्षेत्रातील जमीन, गोदामे मोठमोठी वेअर हाउसेस यात केलेली गुंतवणूक तसेच या कायद्याच्या विरोधातील आंदोलनाला सरकारची दडपण्याची कार्यवाही या सर्व बाबतीत हा कायदा लागू झाल्यास त्याची परिणीती देशाच्या प्रत्येक नागरीकाला भोगावी लागेल यात कोणतीच साशंकता वाटत नाही.

संदर्भ:

१) डॉ. विजय कविमंडन, ' कृषी अर्थशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन नागपूर.
२) डॉ.जी.एन. झामरे, 'भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.
३) Datt R. and Sundharam K.P.M. (2016): Indian economy. S. Chand and Company Ltd., New Delhi.
४) नवीन कृषी कायदा २०२०— राजपत्र

❑❑❑

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

Kai Bapusaheb Ekambekar Sevabhavi Sanstha's

# KAI. BAPUSAHEB PATIL EKAMBEKAR MAHAVIDYALAYA, UDGIR

(Affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)

One Day Interdisciplinary National Conference on

## New Agriculture Acts 2020 :Problems and Prospects

Organized by the Dept. of Economics

## CERTIFICATE

This is to certify that Dr./Prof./Mr./Mrs. Vijay Kshirsagar Bansod.

of Dr. M.K. Umathe College, Nagpur has participated as Resource person/ chairperson / Presented a paper entitled नवीन कृषी कायदा 2020 - फायदे व तोटे.

In the One Day Interdisciplinary National Conference held on Monday, 15 March 2021

Organized by the Dept. of Economics Kai.Bapusaheb Patil Ekambekar Mahavidyalaya, Udgir.

| Prof. Latatai Patil | Dr. Vijaykumar Patil | Dr. Madan Shelke | Dr. Omprakash Kshirsagar |
|---|---|---|---|
| (President) | (Secretary) | (Convener) | (Principal) |

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

Kaladeep-8806852860